# वनसंरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

वनभवन, उस्मानपूरा, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१००५,
दूरध्वनी क्रमांक २३४५५०८. फॅक्स २३३१२०९, ई-मेलः-ccftabad@mahaforest.gov.in


जा.क्र. कक्ष-२/१/आस्था-न्या.प्र./ प्र.क्र.-४५/२५.२६ /633 / सन २०२६-२७ दिनांक01 /09/२०२६

प्रति,
अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुययम संवर्ग)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय :- मुळ अर्ज क्र. १७६/२०२६, श्री दगडू गोविंद राठोड विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२/आस्था/न्या.प्र./ १७८ दिनांक २१/०४/२०२६
२. विभगीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांचेकडील पत्र क्र. ब/सावविजा/न्या.प्र./ १४१२ दिनांक ३१/०८/२०२६
३. श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल साववि जालना यांचा दिनांक २५/०८/२०२६

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल साववि जालना यांनी त्यांचे पदोन्नती संदर्भात मुळ अर्ज क्र. १७६/२०२६, श्री दगडू गोविंद राठोड विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण मुबंई खंडपीठ छ.संभाजीनगर येथे दाखल केलेले आहे. सदरचे प्रकरण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण मुबंई येथे वर्ग करण्यात आलेले असून प्रकरणात परिच्छेद निहाय उत्तर दाखल करणे, व शासनाच्या वतीने बाजु मांडणेसाठी या कार्यालयाचे संदर्भ क्र. ०२ अन्वये प्रतीवादी क्र. ०१ ते ०३ चे वतीने विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण जालना यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

२. त्याअनुषंगाने मा. न्यायालयाने दिनांक १७/०८/२०२६ रोजी श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल व इतर यांचे बाजुणे निर्णय दिलेला असून त्यांचे पदोन्नती बाबत तात्काळ विभागीय निवड समितीची बैठक घेऊन संबंधीताना पदोन्नती देणे बाबत निर्देश दिलेले आहेत. करीता संदर्भ क्र. ०२ चे अर्जान्वये श्री राठोड, वनपाल यांनी न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने सत्वर पदोन्नती मिळणे बाबत विनंती केलेली आहे. याबाबत संदर्भ ०२ नुसार विभगीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांनी अहवाल सादर केलेला असून, सदर पत्राची प्रत व श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल साववि जालना यांचा दिनांक २५/०८/२०२६ रोजी सादर केलेल्या अर्जाची प्रत मा. न्यायालयाचे आदेशाचे प्रतिसह यासमवेत जोडून सादर करण्यात येत आहे.

३. मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे (L.D.C.E) 'वनपाल' म्हणून निवड आणि नियुक्ती झालेले अर्जदार यांना वनपाल म्हणून निवड आणि नियुक्ती होताना त्यांना आरक्षणाचा लाभ मिळाला होता, केवळ या कारणास्तव, आणि मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २७९७/२०२५, महाराष्ट्र राज्य विरुद्ध विजय घोगरे आणि इतर, या प्रकरणात दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, दिनांक २५/०५/२००४ चा शासकीय ठराव (जी.आर.) रद्द करण्यात आला असून, या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे, या कारणास्तव त्यांना 'वनपरिक्षेत्र अधिकारी' या पदावर पुढील पदोन्नती नाकारली जात आहे.

४. अर्जदारांची भूमिका अशी आहे की, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे (L.D.C.E) द्वारे निवडीच्या मार्गाने नियुक्तीसाठी उपलब्ध असलेल्या पदांची संख्या लक्षात घेता जर ती पदे गुणवत्तेनुसार / गुणांनुसार काटेकोरपणे भरली असती, तर या सर्व अर्जदारांची आरक्षणाशिवायही सहजपणे निवड आणि नियुक्ती झाली असती. मुळ अर्ज क्र.

१४२१/२०२५ आणि १४२२/२०२५ मधील अर्जदार ठाणे मंडळातील आहेत, तर मुळ अर्ज क्र. १७६/२०२६ मधील अर्जदार छत्रपती संभाजीनगर मंडळातील असून, श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल साववि. जालना यांना मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षेत एकूण १३५ गुण मिळलेले आहेत. जाहिरात दिलेल्या पदांची संख्या १५ होती. गुणवत्ता यादीत त्याचे नाव अनुक्रमांक १६ वर असले तरी, त्यांना आणि अनुक्रमांक १५ वरील उमेदवार या दोघांनाही समान गुण मिळाले होते. नियमांनुसार, अर्जदाराचे वय अनुक्रमांक १५ वरील उमेदवारापेक्षा जास्त असल्याने, गुणवत्तेनुसार त्याला अनुक्रमांक १५ मिळाला असता. अर्जदारांच्या या विशिष्ट भूमिकेला दिनांक २३/०६/२०२६ रोजीच्या अंतर्गत पत्रव्यवहाराद्वारे दुजोरा मिळतो, ज्याद्वारे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुयम संवर्ग) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. पत्रव्यवहाराची प्रत न्यायालयात सादर करण्यात आली आहे. तसेच अर्जदार यांनी कळविलेनूसार मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षे मार्फत वनपाल पदावर निवड होताना आरक्षणाचा लाभ घेतला असेल, तर तो केवळ सैद्धांतिक ठरेल. अधिसूचित आणि उपलब्ध असलेल्या रिक्त जागांचा विचार करता, जर ते एल.डी.सी.ई. मार्फत निवड होण्याइतके गुणवान असतील, तर आमच्या मते, अर्जदारांची निवड त्यांच्या संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी उपलब्ध असलेल्या रोस्टर पॉईंटनुसार झाली होती. या वस्तुस्थितीकडे प्रतिवादींनी दुर्लक्ष करणे आणि ते अन्यथा पात्र व हक्कदार असल्यास त्यांना वन परीक्षेत्र अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी विचारात घेणे आवश्यक होते, असे नमूद केलेले आहे.

५. उपरोक्त बाबी लक्षात घेता, सर्व मूळ अर्ज मंजूर करण्यात येत असून प्रतिवादींना निर्देश देण्यात येते की, त्यांनी एक विशेष विभागीय निवड समितीची बैठकी (DPC) बोलावून, अर्जदार हे पात्र असल्यास, त्यांना वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी विचारात घ्यावे. तसेच त्यांची मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षा (LDCE) मार्फत वनपाल पदावरील निवड एका विशिष्ट रोस्टर पॉईंटवर झाली होती, ही वस्तुस्थिती विचारात घेऊ नये. पुढील कार्यवाही आणि निर्णय शक्य तितक्या लवकर, आणि कोणत्याही परिस्थितीत चार आठवड्यांच्या आत घेण्यात यावा. असे न्यायालयाने निर्देश दिलेले आहे. सदर प्रकरणी छ. संभाजीनगर वनवृत्तातील मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षेसाठी वनपाल पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी व अंतिम निवड झालेल्या उमेदवारांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | परिक्षार्थी यांचे नाव | जात/प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | २०० पैकी प्राप्त गुण | गुणाची टक्केवारी | वनपाल पदी नियुक्ती झाली किंवा नाही. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ९ | ६ | ७ | ८ |
| १ | वाय. टी. विटोरे | झि.भोई/भज.ब | खुला | १५८.५ | ७९.२५ | पदोन्नत |
| २ | दिनेश एस. मोरे | मराठा/खुला | खुला | १५६ | ७८. | पदोन्नत |
| ३ | एस.व्ही. फरताडे | मराठा/खुला | खुला | १५२.५ | ७६.२५ | पदोन्नत |
| ४ | व्ही. पी. अवचार | महार/अ.जा. | खुला | १५२.५ | ७६.२५ | पदोन्नत |
| ५ | पी.ए. धोंडगे | मराठा/खुला | खुला | १४७.५ | ७३.७५ | पदोन्नत |
| ६ | एन.डी. काळे | मराठा/खुला | खुला | १४२.५ | ७१.२५ | पदोन्नत |
| ७ | एस.जी.वरवडे | कोष्टी/विमाप्र. | खुला | १४२.५ | ७१.२५ | पदोन्नत |
| ८ | एस.आर.मोरे | भिल्ल/अ.ज. | खुला | १४०.५ | ७०.२५ | पदोन्नत |
| ९ | जी.बी. काळे | लिंगायत/खुला | खुला | १४० | ७० | पदोन्नत |
| १० | सी.व्ही. करगळ | धनगर/भज.क. | खुला | १३९.५ | ६९.७५ | पदोन्नत |
| ११ | ए.ए. घोडके | मराठा/खुला | खुला | १३८.५ | ६९.२५ | पदोन्नत |
| १२ | आर.एम. शेख | मुस्लीम/खुला | -- | १३८.५ | ६९.२५ | पदोन्नत नाही |
| १३ | एम.पी. कांबळे | महार/अ.जा. | -- | १३८ | ६९ | पदोन्नत नाही |
| १४ | चक्रेश मा.महाजन | माळी/इमाव. | -- | १३५.५ | ६७.५ | पदोन्नत नाही |
| १५ | दगडू गोविंद राठोड | बंजारा/विजा. अ | विजा. अ | १३५ | ६७.५ | वि.जा. अ मधून पदोन्नत |

६.	एकूण उपलब्ध १५ पदापैकी वरील प्रमाणे अ.क्र. ०१ ते ११ वरील वनरक्षक यांना स्पर्धा परिक्षेव्दारे खुल्या प्रवर्गात उपलब्ध पदानुसार पदोन्नती देण्यात आलेली असून, उर्वरीत वनरक्षक यांना प्रचलीत नियमानुसार बिंदू नामावली नुसार मागासवर्गीय प्रवर्गाप्रमाणे त्यांचे प्रवर्गातुन पदोन्नती दिलेली आहे. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | परिक्षार्थी यांचे नाव | जात/प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | २०० पैकी प्राप्त गुण | गुणाची टक्केवारी | वनपाल पदी नियुक्ती झाली किंवा नाही. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | दगडू गोविंद राठोड | बंजारा/विजा. अ | विजा. अ | १३५ | ६७.५ | वि.जा. अ मधून पदोन्नत |
| २. | अरविंद बाबु पायाळ | महार/अजा | अ.जा. | ११५.५ | ५७.८ | अ.जा. मधून पदोन्नत |
| ३. | सौ ए.एम.चौधरी | महार/अजा | अ.जा. | १००.५ | ५०.३ | अ.जा. मधून पदोन्नत |
| ४. | शिवजी सि.कांबळे | महार/अजा | अ.जा. | ८९ | ४४.५ | अ.जा. मधून पदोन्नत |

७.	सन २०१४ च्या स्पर्धा परिक्षेत छ.संभाजीनगर वनवृत्तात वनरक्षक प्रवर्गातुन वनपाल प्रवर्गात पदोन्नतीसाठी अ.जा. ०३, वि.जा.अ ०१ व खुला प्रवर्गाच्या ११ अशा एकूण १५ पदे उपलब्ध होती, त्यानुसार उपरोक्त यादीत खुला प्रवर्गातील अ.क्र. ०१ ते ११ म्हणजेच श्री अमोल अशोक घोडके, पर्यंत वनपाल पदी बिंदू नामावलीनुसार उपलब्ध असलेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तदनंतर खुल्या प्रवर्गाचे अ.क्र. १२ वरील श्री आर.एम.शेख, अ.क्र. १३ वरील मनोज प्रल्हाद काबंळे व अ.क्र. १४ वरील श्री चक्रेश मा.महाजन यांना खुल्या प्रवर्गाचे पद उपलब्ध नसल्याने नियुक्ती देता आलेली नाही. म्हणजेच श्री राठोड वनपाल यांचेपेक्षा जास्त गुण असताना त्यांना मर्यादीत विभागीय स्पर्धा परिक्षेव्दारे पदोन्नती देण्यात आलेली नाही. श्री कांबळे वनरक्षक यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्याने त्यांना अ.जा. प्रवर्गातुनही पदोन्नती देण्यात आलेली नाही.

८.	न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने जर श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल नियुक्ती प्रवर्ग वि.जा. अ यांना खुल्या प्रवर्गात ग्राहय धरुन वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर पदोन्नती दिल्यास उपरोक्त निवड यादीतील अ.क्र. १२ ते १४ जे की, गुणवत्तेनुसार श्री दगडू गोविंद राठोड यांचेपेक्षा स्पर्धा परिक्षेत अधिक गुण प्राप्त असल्याने त्यांना सुध्दा वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावर पदोन्नती द्यावी लागेल. असे मत आहे. तरी श्री दगडू गोविंद राठोड, वनपाल सामाजिक वनीकरण जालना यांचे पदोन्नती बाबत न्यायालयाने दिनांक १७/०८/२०२६ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही होणेस्तव सविनय सादर करण्यात येत आहे.

(प्रमोद चंद लाकरा)
वनसंरक्षक (प्रादेशिक)
छत्रपती संभाजीनगर

सहपत्र : वरील प्रमाणे

प्रतिलिपी :- विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.